राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई व अधिपत्याखालील परिक्रमा खंडपीठ नागपूर व औरंगाबाद व जिल्हा ग्राहक मंच या कार्यालयातील अराजपपित्रत गट-ब व गट-क कर्मचा-यांची भरती करण्यासाठी राज्यस्तरीय निवड समिती गठित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,

शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.६३/ग्रासं-४

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय (वि), मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- २९ जुलै,२०१९.

<u>वाचा:-</u>
१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र:- पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आ.पु.क., दि. ९.६.२०१७.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक- प्रानिमं-१२१६/प्र.क्र.६५ /१६/१३-अ, दि. १३.६.२०१८.
३. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांचे पत्र क्र.राआ/महा./ आस्था/कर्मचारी भरती/२०१९-३३२३, दि.११.०७.२०१९.

<u>प्रस्तावना:-</u>

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग आयोग, मुंबई व अधिपत्याखालील परिक्रमा खंडपीठ नागपूर व औरंगाबाद व जिल्हा ग्राहक मंच या कार्यालयाकरीता विविध संवर्गातील एकूण ४९७ पदे मंजूर आहेत. नवीन पद निर्मिती, पदांचे पुनरुज्जिवन व पदांचे आढावे इत्यादी प्रस्तावाचे सखोल तपासणी करुन शिफारस करण्यासाठी तसेच रिक्त पदे भरण्यास व काल्पनिक पदे निर्माण करण्यास मान्यता देण्याकरिता गठित केलेल्या अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व सचिव (व्यय) वित्त विभाग, यांच्या अध्यक्षतेखाली उपसमितीने दि.३०.७.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व आयोगाच्या अधिनस्त जिल्हा मंच या कार्यालयातील रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली आहे.

सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय दि.१३.६.२०१८ अन्वये गट-ब (अराजपत्रित) व गट-क या संवर्गातील सरळसेवेचे रिक्त पदे भरताना अनुसरावयाची कार्यपध्दती विहित केलेली आहे. यामध्ये प्रशासकीय विभागाने प्रादेशीक विभाग प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय निवड समिती गठित करण्याची तरतूद आहे. सदर तरतूदीनुसार राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग आयोग, मुंबई व अधिपत्याखालील परिक्रमा खंडपीठ नागपूर व औरंगाबाद व जिल्हा ग्राहक मंच या कार्यालयातील गट-ब (अराजपत्रित) व गट-क या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याचा प्रस्ताव राज्य आयोगाच्या संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये प्राप्त असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णयः-

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग आयोग, मुंबई व अधिपत्याखालील परिक्रमा खंडपीठ नागपूर व औरंगाबाद व जिल्हा ग्राहक मंच या कार्यालयातील गट-ब (अराजपत्रित) व गट-क या संवर्गातील सरळसेवेच्या रिक्त पदांची भरतीच्या कार्यवाहीसाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

राज्यस्तरीय निवड समिती :-

१.	श्री.ए.पी.भंगाळे, अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई (विभाग प्रमुख)	अध्यक्ष
२	श्रीमती उषा ठाकरे, न्यायिक सदस्या, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.	इ.मा.व व महिला सदस्य
३	श्री.ए.जे.ख्वाजा, न्यायिक सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, नागपूर परिक्रमा खंडपीठ	अल्पसंख्यांक सदस्य
४	श्री.एम.पी.भावसार, प्रबंधक (प्रशासन) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई	सदस्य सचिव

सदर समितीने सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय दि.१३.६.२०१८ अन्वये अनुसरावयाची कार्यपध्दतीनुसार आवश्यक कार्यवाही तातडीने करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०७३०१४५००५१७०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्टाचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaskar Baburao Patil

Digitally signed by Bhaskar Baburao Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplier And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bbb17268641691acddf048e6aa2150f79b022d09a6c745e92beb9baeed480e62, serialNumber=c8c342ac9a89937bf462ee75f46842ac6d1fbc12a95dda7bfd1d06d7b79b4191, cn=Bhaskar Baburao Patil
Date: 2019.07.30 14:59:51 +05'30'

(भा.बा.पाटील)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
२. महालेखापाल महाराष्ट्र-१/२, (लेखा व लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर.
३. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
४. वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालय, मुंबई.
५. अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.
६. उप सचिव (ग्रासं-४) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
७. प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.
८. कक्ष अधिकारी (आ.पु.क.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. कक्ष अधिकारी (कार्यासन-१३अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. निवडनस्ती ग्रासं-४.